## *गडचिरोली जिल्हा परिषदेची न्याय प्रविष्ठ प्रकरणे हाताळण्यासाठी वकीलांचे पॅनेल नेमणूकीबाबत.*

## अटी व शर्ती

१. ज्या अधिवक्तांना जिल्हा परिषद गडचिरोलीने नियुक्ती दिली असेल त्यांना नियुक्ती दिल्याच्या आदेशाचे दिनांकापासुन गर्डचिरोली जिल्हा परिषदेच्या विरुद्ध असलेले कोणतेही न्यायालयीन प्रकरण/दावा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्विकारता येणार नाही.

२. न्यायप्रविष्ठ दाव्यातील जिल्हा परिषद गडचिरोली तर्फ प्राप्त झालेली सर्व माहिती संबंधित अधिवक्तांनी त्यांच्यापर्यंत गोपनिय ठेवावी. या माहितीचा उपयोग संबंधित दाव्याच्या प्रकरणात न्यायालयातच जिल्हा परिषदेच्या वतीने करावा. जिल्हा परिषद गडचिरोलीचे संमतिशिवाय या माहितीचा उपयोग इतरत्र त्यांना करता येणार नाही.

३. जिल्हा परिषदेचे न्यायालयीन प्रकरणे साधारणतः क्रमवारीने (रोटेशन प्रमाणे) देण्यात येतील. तथापी एखादे प्रकरण कोणास द्यावे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार अंतिम राहतील.

४. गडचिरोली जिल्हा परिषदेचे नियुक्त अधिवक्ता म्हणुन खालीलप्रमाणे फीसाठी ते पात्र राहतील. फी व दर्शविलेला सादील/किरकोळ खर्च या व्यतिरिक्त इतर कोणताही जादा खर्च मंजूर केल्या जाणार नाही.

अ. मा.औद्योगीक व कामगार न्यायालय, चंद्रपूर येथील दाव्याच्या प्रकरणी प्रती दावा रुपये ४०००/- फी तसेच दाव्याकरीता लागणा-या किरकोळ खर्चासाठी रुपये २५००/-

ब. गर्डचिरोली जिल्हयाच्या न्यायालयातील दाव्याच्या प्रकरणी प्रति दावा रुपये ४०००/- फी तसेच दाव्याकरीता लागणा-या किरकोळ खर्चासाठी रुपये २५००/-

क. उच्च न्यायालयीन व इतर न्यायालयीन तसेच इतर न्यायपिठातील प्रकरणात ब्रीफ ड्राफ करीता/ कायदेशिर लेखी सल्ला देण्याचे शुल्क किंवा अधिवक्ता नोटीसचे उत्तर देण्यास अधिवक्ता फी या करीता प्रत्येक प्रकरणात रुपये १०००/- खर्च देण्यात येईल.

५. कोणत्याही दाव्याच्या प्रकरणामध्ये खर्चासाठी अग्रीम रक्कम मिळणार नाही. फी व सादील/किरकोळ खर्चाची रक्कम संबंधित दाव्याचे अंतिम न्याय निर्णयानंतर संबंधित विभागाकडून दिल्या जाईल.

६. नियुक्त केलेल्या अधिवक्तांना संबंधित न्यायालयाचे ठिकाणी उपस्थित राहून अधिवक्तांचे काम करावयाचे आहे. त्यामूळे ज्या न्यायालयाकरीता त्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्या न्यायालयाकरीता त्यांना प्रवासभत्ता देय राहणार नाही. परंतू वेळप्रसंगी त्यांना अन्य न्यायालयाकरीता वकालतनामा दिल्यास तेथील प्रवासाकरीता वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांना देय असलेली प्रवासभत्याची रक्कम दिली जाईल.

७. न्यायप्रविष्ठ प्रकरणी अतिरिक्त वकीलांची नियुक्ती करणे किंवा प्रकरण कार्यवाहीत असतांना अन्य दुस-या अधिवक्तांस चालविण्यास देणे किंवा प्रकरण सहमतीने आपसी करारानुसार अंतिम निकाली काढण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, गडचिरोली यांना राहतील.

८. कोणत्याही दाव्याचा प्रकरणी कोणत्याही टप्यावर अधिवक्तांना नियुक्ती देण्याचा किंवा काढण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना राहतील.

९. रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर विहीत अटी व शर्तीचा करारनामा टंकलिखीत करुन दिल्यानंतर व नियुक्तीचा आदेश झाल्यानंतर नियुक्तीचा कालावधी ३ वर्षाकरीता राहील. तो वाढविण्याचे अधिकार मु.का.अ. यांना राहील. करारनामा करुन देण्याची कार्यवाही दहा दिवसांत पुर्ण करावी.

१०. वकालतनामा दिल्यानंतर व सर्व संबंधित माहीती, नस्ती तसेच आवश्यक दस्तऐवज अधिवक्तांचे ताब्यात दिल्यानंतर त्याबाबतची पोच लेखी स्वरुपात सबंधित खातेप्रमुख यांना द्यावी व नंतर शुल्लक कारणांसाठी वारंवार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना शक्यतो अधिवक्तांनी त्यांच्या कार्यालयात किंवा न्यायालयात बोलावू नये.

११. अधिवक्तांनी अधिक आवश्यक माहिती, कागदपत्रांबाबत संबंधित विभागास पत्र देवून किंवा प्रत्यक्ष संपर्क साधुन उपलब्द करुन घ्यावी. याबाबत काहीही अडचण आल्यास उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),जि.प.गडचिरोली यांना कळविण्यात यावे.

१२. जी न्यायप्रविष्ठ प्रकरणे ज्या अधिवक्तांना चालविण्यास दिली असेल अशा प्रकरणी नियमानुसार कार्यालयीन बाबीची पुर्तता करण्यास कायदेविषयक लेखी सल्ला देणे त्यांना बंधनकारक राहील याबाबत वेगळी फी दिली जाणार नाही.

१३. सोपविलेल्या न्यायप्रविष्ठ दाव्यांचा अहवाल दरमहा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, गडचिरोली यांना पाठवावा. तसेच दावा न्यायालयात प्रलंबित न राहता न्यायनिर्णय लवकर होईल या दृष्टीने न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा सुरु ठेवावा लागेल.

१४. नेमणुक केलेल्या अधिवक्तांकडे कार्यालयाने दिलेले प्रकरणे कोणतीही सबब सांगुन परत करता येणार नाही आणि काही अपरिहार्य कारणास्तव अपवादात्मक स्थितीत प्रकरण परत करावयाचे असल्यास लेखी स्वरुपात कळविण्यात यावे.

१५. न्यायप्रविष्ठ प्रकरणाबाबत अहवाल व माहिती संबंधित कार्यालयाने मागीतल्याचे पत्र प्राप्त झाल्यापासुन दहा दिवसांचे आत देण्यात यावी तसेच प्रकरणांच्या तारखांची माहिती संबंधित कार्यालयास वेळोवेळी देण्यात यावी. अपवादात्मक स्थिती वगळता

आवश्यकतेपेक्षा अधिक (तिन पेक्षा अधिक वेळ) तारखा घेवु नये. प्रकरण अंतिम निकाली निघाल्यास निकालाचे प्रतिसह लिखीत अभिप्राय व प्रकरणी पुढील कार्यवाहीचे विधीमत नोंदवुन देण्यात यावे.

१६. दोन न्यायप्रविष्ठ प्रकरणे लागोपाठ हरल्यास, प्रकरणी वारंवार न्यायालयात गैरहजर राहिल्यास प्रकरणाची माहिती कार्यालयास वेळोवेळी न दिल्यास, कामकाज असमाधानकारक वाटल्यास कोणतीही सुचना किंवा लेखी पत्र न देता पॅनेल मधुन नांव कमी करण्याचे संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, गडचिरोली यांना राहतील. अशा प्रकारे कोणत्याही कारणाने पॅनेलमधुन कमी केलेल्या अधिवक्तांकडुन त्यांचेकडे असलेली न्यायप्रविष्ठ प्रकरणे संपुर्ण माहीती व कागदपत्रे/नस्ती पत्र मिळाल्यापासुन १० दिवसांचे आत संबंधित विभाग/शाखा यांचेकडे परत करण्यात यावी. अन्यथा संबंधिताविरुद्ध बार कौन्सिल,वकील पंजीकरण विभाग, न्यायालय किंवा अन्य विभागात या विषयीची तक्रार नोंदवून आवश्यक सर्व उपाय करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील, अशा प्रकरणी त्या त्या प्रकरणाची फी त्यांना मिळणार नाही.

१७. वरीलप्रमाणे अनुक्रमांक ४ मधील अ ते क यामध्ये जेथे फी असा उल्लेख आलेला आहे. ***ती रक्कम संपुर्ण दाव्यासाठी एकत्रित रक्कम असुन ती दाव्याचे अंतिम न्यायनिर्णयानंतरच अदा करण्यात येईल.*** याशिवाय कोणत्याही सेवा/सुविधा व सवलती जिल्हा परिषदेकडून उपलब्ध होणार नाही.

१८. करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये वेळोवेळी बदल करण्याचे पॅनेलमध्ये निवड करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

१९. जिल्हा परिषदेचे पॅनेलवरील वकीलांनी जिल्हा परिषदेचे वतीने उत्तरे न्यायालयात तात्काळ दाखल करण्याची दक्षता घ्यावी. तसेच न्यायप्रविष्ठ प्रकरणात जिल्हा परिषदेची बाजू प्रभावीपणे मांडण्यात यावी. त्यांना संबंधित विभागाकडुन दस्तऐवज/माहिती वेळीच प्राप्त न झाल्यास उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),जिल्हा परिषद, गडचिरोली यांना लेखी स्वरुपात किंवा दुरध्वनीव्दारे कळविण्यात यावे.

२०. जिल्हा परिषदेचे पॅनेलवरील अधिवक्तांनी, निश्चित तारखांना कोर्टात हजर राहुन , न्यायालयीन प्रकरणे, जिल्हा परिषदेचे विरुद्ध एकतर्फी निकालात काढण्यात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

२१. वरील सर्व अटी व शर्ती ही गडचिरोली जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या अधिवक्तांना बंधनकारक राहतील.

२२. नियुक्तीचा करारनामा कालावधी नेमणुक आदेशाचे दिनांकापासुन तिन वर्षाचे कालावधीकरीता बंधनकारक राहील.

(डॉ.विजय राठोड, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

(फरेंद्र आर.कुतिरकर)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, गडचिरोली

# -:आवेदन पत्राचा नमुना:-

उमेदवाराचा अलिकडील काढलेला फोटो

१) अधिवक्त्याचे संपुर्ण नांव :- -------------------------------------

२) जन्म तारीख :- -------------------------------------

३) शैक्षणिक अर्हता :- -------------------------------------

४) सनद मिळाल्याची तारीख :- -------------------------------------

५) कायमचा पत्ता(भ्रमणध्वनी/ई मेल सह) :- -------------------------------------

६) पत्रव्यवहाराचा पत्ता :- -------------------------------------

७) पॅन क्रमांक :- -------------------------------------

८) न्यायालयातील पत्ता(बैठक क्रमांक सह):- -------------------------------------

९) अनुभव (आवश्यक पुराव्यासह) :- -------------------------------------

१०) इतर तपशिल :- -------------------------------------

अधिवक्त्याची स्वाक्षरी

(टिपः- वरील अ.क्र.१ ते १० पर्यंतच्या माहितीबाबत आवश्यक पुराव्यादाखल आवश्यक दस्तऐवज स्वस्वाक्षांकीत करुन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.)